**गोवा मुक्तिसंग्रामात साहित्यिकांचे योगदान अमूल्य: डॉ. विनय मडगांवकर.**

'वन्दे मातरम्' हे केवळ गीत नाही तर तो भारतीय स्वातंत्र्याचा हुंकार आहे. याच 'वन्दे मातरम्'च्या घोषाने गोमंतकीय क्रांतीला नवचेतना प्राप्त झाली. या संघर्षमय स्वातंत्र्यसंग्रमांचे गोमंतकीय क्रांतिवीरांनी मराठी भाषेत मांडलेले जीवनानुभव हे प्रेरणादायी आहेत. गोवा मुक्तिसंग्रामात क्रांतिवीरांबरोबर साहित्यिकांचे योगदान देखील अमूल्य असे होते. असे उद्गार मराठी अध्ययनशाखेचे संचालक डॉ. विनय मडगांवकर यांनी काढले. गोवा विद्यापीठातील शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळे अंतर्गत कार्यरत असलेल्या मराठी अध्ययनशाखेचे आयोजित केलेल्या बोरकर पुण्यातिथी, पंचधारा विशेषांकाचे प्रकाशन व वंदे मातरम शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष या सर्वाचा समन्वय साधून आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रमुख वक्ता म्हणून 'गोवा मुक्तिसंग्राम आणि मराठी साहित्य' या विषयावर ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर. अधिष्ठाता प्रोफेसर अनुराधा वागळे व तेलंगाना येथील 'पंचधारा' या त्रैमासिकांने प्रकाशित केलेल्या 'गोवा मुक्तीसंग्राम आणि साहित्य' या विशेषांकाचे अतिथी संपादक डॉ. चिन्मय घैसास उपस्थित होते.

डॉ. विनय मडगांवकर आपल्या भाषणात पुढे म्हणाले की गोवा मुक्ती संग्रामावर मराठीत आज वेगवेगळे साहित्य उपलब्ध आहे अजूनही बऱ्याच विषयांवर लिहिता येण्यासारखे असून तरूण पिढीने याबद्दल गांभिर्याने विचार केला पाहिजे. बा.भ. बोरकर यांनी गोवा मुक्ती साठी गोव्याबाहेर जाऊन विविध स्तरांवर गोवा मुक्तीसाठी प्रयत्न केले. पं. महादेवशास्त्री जोशी यांचे योगदान तसेच क्रांतिवीरांचे स्वनुभव कथन अमूल्य असे होते. गोमंतकीय स्वातंत्र्यसेनानी तथा गोवा विधानसभेचे पहिले सभापती पा. पु. शिरोडकर यांचे 'आठवणी माझ्या कारावासाच्या काळ्या निळ्या पाण्याच्या' हे आत्मनिवेदन, प्रभाकर सिनरी त्यांचे 'अंधारातून प्रकाशाकडे' हे स्वानुभव कथन, गजानन रायकर लिखित 'स्वातंत्र्यलढ्यातील काही आठवणी', मोहन रानडे यांचे 'सतीचे वाण' हे आत्मचरित्र, प्रभाकर वैद्य लिखित 'अग्नीच्या ज्वाला'हे आत्मकथन आहेत. गोमंतकीय मराठी आत्मकथनात्मक साहित्यकृतींमध्ये गोमंतकीय क्रांतिवीरांचे ऐतिहासिक योगदान लक्षवेधी आहे. अस्नोडा येथील बाळा राया मापारी, गोव्याच्या क्रांतीयज्ञातील प्रथम हुतात्मा ठरले. पेडणे तालुक्यातील बाळा देसाई आणि बापू गवस मोंतेरोमुळेच वीरगतीला प्राप्त झाले. अशा क्रांतिवीरांना पूजनीय जीवनमुक्त महाराजांनी आपल्या अभंगामधून अभिवादन केले आहे. बा. भ. बोरकर, गजानन रायकर यांची क्रांतिकाव्ये अभ्यासनीय आहेत तसेच गजानन रायकर यांचा 'नतालीन' या कथासंग्रह, जयराम कामत यांची 'क्रांतीदूत'ही कथा पु. शि. नार्वेकर यांच्या विघ्नहर्ता, नियती या कथा गोवामुक्ती संग्राम या विषयावर केंद्रित आहे. गोमंतकीय स्वातंत्र्यलढ्याचा संघर्षमय इतिहासाच्या पार्श्वभूमीवर बा. द. सातोस्कर यांच्या 'जाई'आणि 'आज मुक्त चांदणे' सुभाष भेंडे यांनी आपल्या 'होमकुंड''आमचें गोंय आमकां जाय' रा. का. बर्वे यांची'होमकांड' चंद्रकांत काकोडकर लिखित 'गोमन्तका जागा हो' या कादंबरीत गोमंतकीय स्वातंत्र्यसंग्राम या विषयाचा आधार घेतला आहे.

प्रोफेसर अनुराधा वागळे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात डॉ. चिन्मय घैसास यांनी अशा अत्यंत महत्त्वाच्या विषयावर गोव्याबाहेरील एका नियतकालिकला या विषयावर विशेषांक काढण्यास सांगितले व त्याचे अतिथी संपादकपद स्वीकारून एका देखण्या अंकाची निर्मिती केली व त्या निमित्ताने अनेक तरूण संशोधकांना लिहिते केले त्याबद्दल त्यांचे कौतुक केले. तसेच बा.भ. बोरकर हे गोमंतकीय साहित्याचा मानदंड असल्याचे सांगून त्यांच्या साहित्याची अजूनही समीक्षा होणे आवश्यक असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. चिन्मय घैसास यांनी केले त्यांनी आपल्या प्रास्ताविकात हा विशेषांक काढण्यास पाठीमागची पार्श्वभूमी विशद करून सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. वृषाली जोशी हिने केले तर डॉ. पूर्वा वस्त यांनी आभार मानले. या प्रसंगी या विशेषांकात ज्यांनी आपले संशोधनात्मक निबंध प्रकाशित केले आहेत त्यांचा अधिष्ठाता प्रोफेसर अनुराधा वागळे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.



**फोटो :** अधिष्ठाता प्रोफेसर अनुराधा वागळे, मराठी अध्ययनशाखेचे संचालक डॉ. विनय मडगांवकर, डॉ. चिन्मय घैसास, प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थी